कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

टोल फ्री क्रमांक - 1064

कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

:: **प्रेस नोट** :: दिनांक :- 07.10.2020.

**खादी ग्रामोदयोग जालना येथील जेष्ठ पर्यवेक्षक श्री. रुपसिंग अबुसिंग ठाकुर यास 2,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | लोकसेवक श्री. रुपसिंग अबुसिंग ठाकुर वय 53 वर्ष व्यवसाय नोकरी जेष्ठ पर्यवेक्षक, खादी ग्रामोदयोग औरंगाबाद रोड जालना रा. मुन्नाभाई कॉम्पलेक्स टाऊनहॉल जुना जालना मुळ रा. गोविंदनगर, हिंगोली नाका नांदेड |
| 2 | गुन्हा घडला ता/ठि | :- | दि- 07.10.2020 रोजी खादी ग्रामोदयोग कार्यालय औरंगाबाद रोड जालना येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 2,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांनी त्यांचे पत्नीचे नावाने खादी ग्रामोदयोग कार्यालय जालना येथे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती अंर्तगत मिनरल बॉटल उदयोगासाठी 50 लाख रुपये कर्ज मिळणेसाठी फाईल तयार करुन सादर केली होती. तेव्हा खादी ग्रामोदयोग जालना येथील श्री रुपसिंग अबुसिंग ठाकुर, जेष्ठ पर्यवेक्षक यांनी तक्रारदार यांचेकडे फाईल मंजुरीस पाठविण्यासाठी 2,000/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन दि. 05.10.2020 रोजी पडताळणी केली असता आलोसे श्री ठाकुर यांनी तक्रारदार यांचेकडे 2,000/- रुपयेची लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले होते, तसेच आज दि. 07.10.2020 रोजी आलोसे श्री. रुपसिंग अबुसिंग ठाकुर, जेष्ठ पर्यवेक्षक यांनी तक्रारदार यांची कर्ज फाईल मंजुरीस पाठविण्यासाठी त्यांचेकडुन 2,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्वीकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने खादी ग्रामोदयोग कार्यालय, औरंगाबाद रोड, जालना येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

लोकसेवक श्री. रुपसिंग अबुसिंग ठाकुर वय 53 वर्ष व्यवसाय नोकरी जेष्ठ पर्यवेक्षक, खादी ग्रामोदयोग औरंगाबाद रोड जालना रा. मुन्नाभाई कॉम्पलेक्स टाऊनहॉल जुना जालना मुळ रा. गोविंदनगर, हिंगोली नाका नांदेड यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,<br>
लाचलुचपत प्रतिबंधक<br>
विभाग,जालना.